झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
बी.एस.एन.एल. बिल्डिंग, पहिला मजला,
पोस्ट ऑफिस शेजारी, शिवाजीनगर, पुणे-०५
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/ ७५ /२०१९
दिनांक :- २१ / ०१ /२०१९

**"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल झालेला आहे. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.झोपुप्रा/तांत्रिक/१८५९/२०१७ दि.२८/११/२०१७ नुसार "ज्या खाजगी जागेवरील झोपडपट्टया घोषित नाहीत, अशा झोपडपट्टयांच्या बाबतीत या कार्यालयाकडील आदेश क्र.२१५ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीबाबत अंतिम निर्णय घेतल्यानंतर, सदरचे क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३(क) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून प्रथम घोषित करणे आवश्यक राहील, सदरचा आदेश झाल्यानंतरच योजनेच्या अनुषंगाने प्राथमिक सर्व्हेक्षणाचे जाहीर प्रकटन, पात्रता यादी (परिशिष्ट-२) व इतर अनुषंगिक कामे याबाबतची कार्यवाही करता येईल", अशी कार्यपध्दति निश्चित करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे उप आयुक्त परिमंडळ क्र.१, पुणे महानगरपालिका यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल त्यांचेकडील कार्यालयीन पत्र जा.क्रउआप १/८७१ दि.२८/१०/२०१६ रोजी सादर केला आहे व तसेच मान्य विकास आराखडा सन २०१६ नुसार खालील अनूसूचिमध्ये नमूद केलेले झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र हे 'झोपडपट्टी सुधार क्षेत्र' (Slum Improvement Zone) म्हणून समाविष्ट आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमुर्लन व पुर्नविकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो, व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबददल त्याची खात्री पटल्यावर, कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे, किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यांनतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील", असे नमूद केले आहे.

आणि ज्याअर्थी, दि.२१/१२/२०१८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात तसेच २० ते २६ डिसेंबर २०१८ महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुरवणी, पान क्र.११ मध्ये प्रसिध्दी करिता देणेत येवून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सुचना/हरकती असतील त्या ३० दिवसांच्या आत सादर करणेस फर्माविण्यात आलेले आहे.

उक्त नोटीसीस अनुसरुन या कार्यालयाकडे कोणतीही हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे सुनावणी घेण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सबब, सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

Scanned with CamScanner

त्याअर्थी मी पांडुरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई-४०००५१ यांचेकडे अपील दाखल करता येईल आणि उक्त अपीलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सि.स.नं.१००७ व १००८, स.नं.८९ व ९०, लोकमान्य कॉलनी, कोथरुड, पुणे | १०८६५.७३ चौ. मी. | **पुर्वेस -** रस्ता<br>**पश्चिमेस -** स.नं.९२ व ९३<br>**दक्षिणेस -** रस्ता<br>**उत्तरेस -** रस्ता | मे. प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स् ए-१०१ निलायन फायनल प्लॅट नं.७०/६/१ सि.टी.एस.नं. ४७/६/१ कै.वी.आ.मोडक पथ अभिनव शैक्षणिक संकुल जवळ,एरंडवणे,पुणे-४११ ००४ |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

(पांडुरंग पोले)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक -२१ / ०१ /२०१९

Scanned with CamScanner